स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

“नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक अभ्यास”

Research Proposal submitted to Swami Ramanand Teerth Marathwada University for Ph.D. Degree

संशोधक

श्री. सुनिल सोमा गावित

(M.A., B. Ed., NET)

सहाय्यक प्राध्यापक

दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स & कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

मार्गदर्शक

डॉ. ए. के. हांगे

सहाय्यक प्राध्यापक

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर

एप्रिल २०१८.

“नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक अभ्यास”

(A Geographical Study of Rural Settlement In Nandurbar District)

1.1 प्रस्तावना-

प्राचीन काळात मानव गुहामध्ये राहत असे. त्या गुहा संस्कृतीपासून ते आजच्या प्रगत युगातील अवकाश संस्कृतीच्या मानवी निवासाचे अध्ययन वस्ती भूगोलात केले जाते. अनुकूल घटकांच्या सहाय्याने मानव वस्ती स्थापन करून त्याच्या क्रिया पार पाडतो. यातूनच वस्ती भूगोल हि मानवी भूगोलाची एक मुलभूत उपशाखा उदयास आली.

वस्ती म्हणजे मानवी संस्कृतीचा एक मूर्त अविष्कार होय. मानवाच्या मुलभूत आणि मानसिक गरजा भोवतालच्या पर्यावरणाशी निगडीत असतात. पृथ्वीवर मानव व भौगोलिक पर्यावरण व पर्यावरणातील घटकात जवळचे सबंध असून मानव पर्यावरणातील विविध अनुकूल घटकांच्या सहाय्याने वस्ती करून आपले जीवन व्यतीत करतो. मानवाच्या उत्पत्तीपासून काळाबरोबर मानवाचा विकास होत गेला आणि पर्यावरणाशी एकरूप होण्याचा प्रयत्न सुरु झाला आणि प्राकृतिक पर्यावरणाला जो पहिला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला त्याला वस्त्यांच्या रूपाने मूर्त स्वरूप प्राप्त झाले. यामुळेच भूगोलामध्ये वस्त्यांच्या अभ्यासाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

वसाहतीचे ग्रामीण आणि नागरी असे दोन प्रकार पडतात. यावरून देशामध्ये १०,००० पर्यंत लोकसंख्या असणारी वस्ती ज्यामध्ये ७५ % लोक प्राथमिक उत्पादनासबंधित कार्य करतात. त्यांना ग्रामीण वसाहती असे म्हणतात. (सिंह, २००८) उदा. लोक शेती, मासेमारी, लाकूडतोड, कंदमुळे गोळा करणे, खाणकाम इ. तर, ज्या वस्तीमध्ये द्वितीयक व तृतीयक स्वरूपाच्या व्यवसायांमध्ये लोक जास्त गुंतलेले असतात, त्यांना नागरी वसाहती म्हणतात.

जगातील बहुतांशी वसाहती या ग्रामीण स्वरूपाच्या असून जगातील ६०% पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण वसाहतीमध्ये आढळते. (घारपुरे, २०००) ग्रामीण वस्त्यांच्या विकासातून, वाढीतून नागरी वस्त्यांची निर्मिती होते. म्हणून ग्रामीण वसाहती मानवी संस्कृतीचा वारसा जपतात. तसेच नागरी लोकसंख्येच्या दैनंदिन अन्नविषयक गरजांची पूर्तता ग्रामीण वसाहती करतात. म्हणून वसाहतींचा अभ्यास हा मानवी समाजाच्या सामाजिक व भौगोलिक पूर्ततेसाठी गरजांच्या स्थल, कालसापेक्ष

अभ्यास होय. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी *“नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक अभ्यास”* हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

१.२ व्याख्या – (वस्ती भूगोल/ अधिवास/ वसाहत

१. “मानवी समाजास आवश्यक असलेल्या सामाजिक व भौगोलिक घटकांची शेतवाड्या, गृहसमूह, नगरे इ. अभिक्षेत्रीय व्यवस्था म्हणजे वस्ती होय.” – डिकिन्सन

२. “कृतीशील मानव व गतिशील निसर्ग यांच्यातील सातत्यपूर्ण स्थैर्याचा प्रगमनशील संचय म्हणजे वस्ती किंवा अधिवास होय.”

३. “मानव आणि भौगोलिक परिसराची अंगे यांचा स्थळ व काळाच्या संदर्भात केलेल्या भौगोलिक अभ्यासास वसाहत किंवा अधिवास असे म्हणतात.”

१.३ अभ्यास क्षेत्र-

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील नंदुरबार जिल्हा निवडलेला असून हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या वायव्य दिशेला असून या जिल्ह्याच्या उत्तरेला व पूर्वेला मध्यप्रदेश, पश्चिमेला गुजरात् व दक्षिणेला धुळे जिल्हा आहे. या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार २१° 0’ उत्तर ते २२° ३’ उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७३° ३१’ पूर्व ते ७२° ३२’ पूर्व च्या दरम्यान आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्र ५,०३५ चौ. कि. मी. एवढे असून जिल्ह्यात नवापुर, शहादा, तळोदा, अक्कलकुवा, धडगाव (आक्राणी) नंदूरबार इ. सहा तालुके आहेत.

Map. No. 1

१.४ गृहीतके -

१. ग्रामीण वसाहतीवर तेथील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांचा प्रभाव पडतो.

२. नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतींचे वितरण व आकार प्रदेशानुसार बदलत जातो.

१.५ अभ्यासाची उद्दिष्ट्ये –

१. नंदूरबार जिल्ह्यातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतींच्या उत्क्रांतीचा आढावा घेणे.

३. नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतींच्या वितरण व वाढीचा अभ्यास करणे.

४. नंदूरबार जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास करणे.

५. ग्रामीण वसाहतींच्या प्रकार आणि प्रारूपांच्या अभ्यास करणे.

६. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्त्यांच्यासाठी लागणाऱ्या बांधकाम साहित्यांची व अंतर्गत रचनेचा अभ्यास करणे.

७. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतीमधील सेवाकेंद्रांची आणि सेवा सुविधांची माहिती मिळवणे.

८. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतींच्या विविध समस्यांचे विश्लेषण करून उपाय योजना सुचविणे.

१.६ संशोधन पद्धती आणि माहिती संकलन-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक स्रोतांचा उपयोग केला जाणार आहे. तसेच नमुना निवड पद्धतीचा देखील वापर करण्यात येईल. वसाहतींचे, लोकसंख्येचे वितरण अभ्यासासाठी जिल्हा जणगणना अहवाल (१९९१, २००१, २०११) जिल्हा आर्थिक आणि सामाजिक अहवाल यांचा वापर करण्यात येईल. रस्ते, वाहतूक, क्षेत्रफळ इ. जिल्हा स्थलदर्शक नकाशांचा वापर करण्यात येईल. त्याचबरोबर विषयाच्या संदर्भग्रंथ, प्रकाशित पुस्तके, शोधप्रबंध, शोधपत्रिका, मासिके. अप्रकाशित शोधप्रबंध इ. त्याचबरोबर GIS, GPS, GOOGLE EARTH, SPSS इ. संगणकीय सॉफ्टवेअरचा वापर करण्यात येईल.

१.७ अभ्यास क्षेत्राची निवड व महत्त्व -

सदरच्या संशोधनासाठी महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्हा निवडला असून संशोधनाचा विषय "नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक अभ्यास" हा आहे. सदर विषय निवडण्याचे कारण १ जुलै, १९९८ रोजी धुळे जिल्ह्यापासून नवीन नंदूरबार जिल्ह्याची निर्मिती झाली. हा जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो कारण या जिल्ह्याची ६५% पेक्षा जास्त लोकसंख्या अनुसूचित जमातीची असून मागास, अविकसित सातपुडा पर्वताच्या डोंगर दऱ्यात राहते. या ठिकाणच्या ग्रामीण वसाहतींच्या विकासातील अडचणी विविध समस्यांचा शोध, वस्त्यांची अंतर्गत रचना, ग्रामीण भागातील सेवा केंद्रे, सेवा केंद्राची माहिती तसेच ग्रामीण वसाहतीवर पडणारा सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा पडणारा परिणाम इ. च्या अभ्यासासाठी या विषयाची निवड केली.

सदर संशोधनामुळे या भागातील अनेक पैलू अभ्यासले जातील. त्यामुळे ग्रामीण वसाहतीमध्ये असणाऱ्या विविध समस्या,सेवा केंद्राची कमतरता, विकासातील अडथळे इ. तसेच ग्रामीण वस्त्याचा विकास करण्यासाठी शासनाच्या विविध योजना राबवून त्या वसाहतींचा व ग्रामीण भागाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. या संशोधनामुळे शासनाला ग्रामीण भागातील व वसाहतींच्या विविध समस्या, मुलभूत सुविधा, गरजा इ. ची माहिती उपलब्ध होईल यामुळे योग्य उपाययोजना करता येईल यासाठी मी माझ्या संशोधनाचा "नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचा भौगोलिक अभ्यास" हा निवडलेला आहे.

१.८ संशोधन साहित्याचा आढावा –

संशोधन साहित्यांच्या आढाव्यामुळेपूर्वी केलेल्या संशोधनाची दरी भरून काढली जाते. त्याचबरोबर निवडलेल्या विषयास भविष्यातील कार्यासाठी दिशा मिळते.

१. सी. डी. देशमुख (१९४१) यांनी बॉम्बे शहर आणि नगरांचे कार्य यांचा अभ्यास केला असून महाराष्ट्रातील नागरी केंद्रे व त्यांच्या "शहरे" पुस्तकात शहरांची वाढ आणि कार्य यांचा हि अभ्यास केला आहे.
२. भट्टाचार्य एन. डी. (१९६५) यांनी पश्चिम बंगाल मुरशीबाद जिल्ह्यातील वसाहतीचा त्यांच्या पी. एच. डी. प्रबंधामध्ये अभ्यास करताना वसाहतींची उत्क्रांती, वाढ आणि स्वरूप यांचे विश्लेषण केले आहे. त्याचप्रमाणे उत्क्रांती, वाढ आणि स्वरूप यावर भौतिक घटकांचा प्रभाव पडतो, असे सांगितले आहे.
३. सिन्हा एन. पी. (१९७६) यांनी त्यांच्या पीएच. डी. प्रबंधामध्ये छोटा नागपूर पठारावरील वस्ती भूगोलाचा अभ्यास केला आहे.

४. कनकुरे के. बी. (१९८६) यांनी मराठवाड्यातील नागरी व ग्रामीण वस्त्यांचा केला आहे.
५. सावंत एस. बी. (१९७८) यांनी नागरी भूगोलाचा अभ्यास केला आहे.
६. मंडल आर. बी. (१९७५) यांनी त्यांच्या बिहार मैदान : एक केंद्र स्थळ या प्रकाशित लेखामध्ये बिहार मैदानाची केंद्रीयता तपासली आहे.
७. कुंभार ए. पी. (१९९७) यांनी नीरा खोऱ्यातील ग्रामीण वसाहतीच्या अभ्यास केला आहे.
८. पस्तापुरे बी. एन. (२००८) यांनी नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचा अभ्यास केला आहे.

१.९ संशोधनाची प्रकरण योजना किंवा रचना-

प्रकरण १ ले – प्रस्तावना

या प्रकरणामध्ये विषयाची संकल्पना, वस्ती भूगोलाची व्याख्या, अभ्यास क्षेत्राची निवड, गृहीतके, उद्दिष्ट्ये, माहिती संकलन, संशोधनावर आधारित पुनरावलोकन, संशोधन प्रकरण योजना इ. चा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण २ रे – अभ्यास क्षेत्राची प्रादेशिक संरचना

या प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक रचना, भूशास्त्रीय रचना,नद्या, मृदा, हवामान, वनस्पती, सांस्कृतिक पर्यावरण, ग्रामीण वसाहतीची घनता, वाहतूक, दळणवळण, पशुधन, लोकसंख्या, लिंगगुणोत्तर, साक्षरता, जलसिंचन, भूमीउपयोजन इ. घटकाचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ३ रे – ग्रामीण वसाहतीची उत्क्रांती

या प्रकरणामध्ये ग्रामीण वसाहतीच्या निर्मितीचा अभ्यास करण्यात येईल. तसेच प्राचीन काळातील ग्रामीण वसाहती, मध्ययुगीन काळातील ग्रामीण वसाहती व अर्वाचीन काळातील ग्रामीण वसाहती असे विवेचन करण्यात येईल, तसेच ग्रामीण वसाहतीचे स्थळानुरूप नावे व नैसर्गिक घटकाला अनुसरून नावाचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण ४ थे – अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतींचे वितरण व वाढ

या प्रकरणामध्ये भूरचनेला अनुसरून ग्रामीण वसाहतीचे वितरण, कृषीला अनुसरून, सिंचनाला अनुसरून, रस्त्याला अनुसरून, लोकसंख्येला अनुसरुन ग्रामीण वसाहतीचा आढावा घेतला जाईल. तसेच लोकसंख्येच्या गटानुसार वसाहतीचे वितरण यांचाही अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण ५ वे – वसाहतींचे स्थान प्रकार व आणि प्रारूप

या प्रकरणामध्ये ग्रामीण वसाहतीचे स्थान, ग्रामीण वसाहतींचे प्रकार, ग्रामीण वसाहतींचे प्रारूप यावर भौगोलिक घटकांचा होणारा परिणाम यांचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण ६ वे – ग्रामीण वसाहतींची अंतर्गत रचना आणि बांधकाम साहित्य

या प्रकरणात सर्वेक्षणावर आधारित सर्वे करून ग्रामीण वसाहतींचे स्थान व स्थिती, अंतर्गत रचना, बांधकामानुसार घरांचे प्रकार, घरांसाठी वापरण्यात आलेले बांधकाम साहित्य, ग्रामीण वसाहतींचे आकार, घरांची घनता इ. विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण ७ वे- अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण सेवाकेंद्रे

या प्रकणात ग्रामीण सेवाकेंद्राचे वर्गीकरण, ग्रामीण सेवा सुविधाची क्षमता इ. घटकाचा सविस्तर अभ्यास केला जाईल.

प्रकरण ८ वे – निष्कर्ष

या प्रकरणात नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीच्या संशोधन अभ्यासाचे निष्कर्ष, समस्या व समस्येवरील उपाय योजना इ. चे विवेचन करण्यात येईल.

संदर्भग्रंथसूची

१. कनकुरे के. बी., काळसकर एस. एन. (२०११) , परभणी जिल्ह्यातील ग्रामीण सेवा केंद्राचा भौगोलिक अभ्यास, शोध, समीक्षा और मुल्यांकन Vol. II Issue Jan. 24, 2011. pp 155.156.

२. कनकुरे के. बी., पस्तापुरे भागवत व धनुश्वर रमेश (२०११) : “नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण वस्ती स्थळांच्या नावाच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास” Universal Research Analysis Vol. I Issue II March August 2011.

३. लवांडे एस. एम. आणि चौधरी एस. आर. (२००३) : पूर्णा खोऱ्यातील ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती” म. भू. प. पुणे Vol. xvii No. 1 June 2003. PP 1-9

४. गोणे सदानंद, कोरे निर्मला, नातलगावे बस्वराज व काळगापुरे अप्पाराव (२००९) : “ परभणी जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी साक्षरतेचा भौगोलिक अभ्यास” शोध, समीक्षा और मुल्यांकन Vol. II Issue vii Aug. 24, 2009. pp 418- 419.

५. काळगापुरे अप्पाराव व गोणे सदानंद (२००९) : परभणी जिल्ह्यातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास, शोध, समीक्षा और मुल्यांकन Vol. II Issue 7, Aug.2009. pp 416-417

६. एस. बी. सावंत (१९७८) : “पुणे नागरी भूगोलाचा अभ्यास”

७. कणकुरे के. बी. (१९६८) : “मराठवाड्यातील नागरी व ग्रामीण अभ्यास”

८. कुंभार ए. पी. (१९९७) : “ नीरा खोऱ्यातील ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास”

९. वरात टी. एम. (२००४) : प्रवरा खोऱ्यातील ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती : एक भौगोलिक विश्लेषण”

१०. देशमुख पी. डब्लू. (१९७९) :ऊर्ध्व कृष्णा खोऱ्यातील केंद्र स्थळ : एक अभ्यास”

११. डॉ. शैलेश वाघ, सिद्धार्थ सोनवणे (२०१४) : “ग्रामीण व नागरी वस्ती भूगोल”, अथर्व पब्लिकेशन पुणे.

१२. Ahmaed E. (1948) : “A systematic study of rural and urban settlement of Uttarpradesh (India), Ph. D. Thesis Submitted to the University of London.

१३. Bhttachary N. D. (1965) : Evolution of settlement in District of Murshidabad, West Bengol,

१४. Census Of India, District Census Handbook, Nadurbar (2001)

१५. Diddee, Jaymala (1978) : “Central Places In Upper Bhima Basin”, unpublished Ph. D.Thesis, University of Poona.

१६. Deshpande C. D. (1942) : Settlement of Bomaby, Karnataka, the Indian Geographical Journal, Vol. xvii PP.115-131.

१७. Kumbhar A. P. (1988) : “A study of Rural Habitat In Nira Valley”, Ph. D. Thesis, Shivaji university, Kolhapur.

१८. Mandal R. B. (2000) : “Urban Geography”, Concept publishing Company, New Dehli.

१९. Sawant S. B. (1978) : “Poona : A study in Urban Geography.

२०. Sinha V. N. P. (1978) : Chota Nagpur Plateau :A study in Settlement Geography, Ph.D. Thesis.